पिंपरी चिंचवड महानगरपालिका, रहाटणी, पुणे - 17

ड प्रभाग समिति

**कार्यपत्रिका क्र.6**

**सभावृत्तांत**

दिनांक 02/11/2012 वेळ दुपारी 12.00 वाजता

---

पिंपरी चिंचवड महानगरपालिका ड प्रभाग समितीची मासिक सभा शुक्रवार दि.02/11/2012 रोजी दुपारी 12.00 वाजता ड प्रभाग कार्यालयाच्या सभागृहामध्ये आयोजित करणेत आली होती. सदर सभेस पुढीलप्रमाणे सन्मा.सदस्य उपस्थित होते.

| | | |
|---|---|---|
| 1. | मा.निता पाडाळे, | अध्यक्षा |
| 2. | मा.हिरानंद आसवा□ी | सदस्य |
| ३. | मा.प्रमोद ताम्हणकर | सदस्य |
| 4. | मा.विनोद नढे | सदस्य |
| 5. | मा.कैलास थोपटे | सदस्य |
| 6. | मा.अप्पा पवार | सदस्य |
| 7. | मा.विनय गायकवाड | सदस्य |
| 8. | मा.विलास नांदगुडे | सदस्य |
| 9. | मा◌ा.बापू उर्फ शत्रुघ्न काटे | सदस्य |
| 10 | मा.रामदास बोकड | सदस्य |
| 11. | मा.राजेंद्ग जगताप | सदस्य |
| 12. | मा.नवनाथ जगताप. | सदस्य |
| 13. | मा.प्रशांत शितोळे | सदस्य |
| 14. | मा.सुनीता वाघेरे | सदस्या |
| 15. | मा.विमल काळे | सदस्या |
| 16. | मा.अनिता तापकीर | सदस्या |
| 17. | मा.विमलताई जगताप | सदस्या |
| 18. | मा.माया बार□े | सदस्या |
| १९. | मा.स्वाती कलाटे | सदस्या |
| 20. | मा.आरती चोंधे | सदस्या |
| 21. | मा.शैलजा शितोळे | सदस्या |
| 22. | मा.सुषमा तनपुरे | सदस्या |

याशिवाय मा. पी.एच.झुरे प्रभाग अधिकारी, मा. विजय इंगुळकर, प्रभारी प्रशासन अधिकारी, सभा शाखा, मा.दांगट, कार्यकारी अभियंता, स्थापत्य, मा.के.जी.थोरात, कार्यकारी अभियंता, विदयुत, मा.शरद जाधव, कार्यकारी अभियंता, पाणीपुरवठा विभाग, मा.डॉ.गोरे, पश्ुवैदयकिय अधिकारी मा.आय.वाय.सय्यद, उपअभियंता, स्थापत्य मा.जीवन गायकवाड, उपअभियंता स्थापत्य, मा.अनिल शिंदे, उपअभियंता, स्थापत्य, मा.रामनाथ टकले, उपअभियंता स्थापत्य, मा.दिलीप धुमाळ, उपअभियंता विदयुत, मा.एम.बी.सोनवणे, उपअभियंता विदयुत, मा.अजय सुर्यवंशी, उपअभियंता पाणीपुरवठा विभाग, मा.देसले, उपअभियंता, पाणीपुरवठा विभाग, मा.अनिल राऊत, उपअभियंता जलनिसारण विभाग, मा.एस.डी.लगस, सहा.आरोग्याधिकारी, मा. व्ही.एल.चव्हाण, सहा.आरोग्याधिकारी इत्यादी अधिकारी उपस्थित होते.

सभेच्या सुरुवातीस मा.अध्यक्ष यांनी सर्व उपस्थितांचे स्वागत करुन सभेच्या कामकाजास सुरुवात केली. तदंनतर मा.अध्यक्ष यांनी मागील कार्यपत्रिका क्र.5, दिनांक 05/10/2012 रोजीच्या सभेचा सभावृत्तांत कायम करण्यात आल्याचे प्रकट केले.

तदनंतर मा.अध्यक्ष यांचे मान्यतेने व मा.नगरसदस्य यांचे मागणीप्रमाणे पुढीलप्रमाणे ऐनवेळचे विषय सभा कामकाजात दाखल करुन घेण्यात आले.

**विषय क्र.1 -** सांगवी येथील उदयानावे नामकरण करणे कामीच्या प्रस्तावास मान्यता देणे बाबत विचार करणे मा.बापू काटे यांचा प्रस्ताव.

**विषय क्र.2 -** नवी सांगवी येथील रस्ता नामकरणाच्या प्रस्तावास मान्यता देणे बाबत विचार करणे मा.नवनाथ जगताप यांचा प्रस्ताव.

**विषय क्र.3 -** प्रभाग क्र.44 मधील कॉलनी , चौक पथ यांना नांवे देणे कामीच्या प्रस्तावास मान्यता देणे बाबत विचार करणे मा.सुनिता वाघेरे यांचा प्रस्ताव.

**विषय क्र.4 -** प्रभाग क्रमांक 44 मधील गेलॉर्ड चौकातील टॉयलेट ब्लॉक काढणे कामीच्या प्रस्तावास मान्यता देणे बाबत विचार करणे मा.हिरानंद आसवाणी यांचा प्रस्ताव.

**विषय क्र.5 -** काळेवाडीमधील किरकोळ दुर स्तीच्या कामांस मान्यता देणे बाबत विचार करणे मा.निता पाडाळे यांचा प्रस्ताव.

**विषय क्र.6 -** रस्त्यांस व चौकास नांव देणयाकामीच्या प्रस्तावास मान्यता देणे बाबत विचार करणे मा.विनोद नढे यांचा प्रस्ताव.

**विषय क्र.7 -** नामफलक लावणे कामीच्या प्रस्तावास मान्यता देणे बाबत विचार करणे मा.निता पाडाळे यांचा प्रस्ताव.

**विषय क्र.8 -** प्रभाग क्र.53 मध्ये नांव देण्याकामीया प्रस्तावास मान्यता देणे बाबत विचार करणे मा.विनय गायकवाड यांचा प्रस्ताव.

ठराव क्रमांक 50 विषय क्र. 01
दिनांक 02/11/2012 विभाग - स्थापत्य
सुचक - मा. शत्रुघ्न काटे अनुमोदक - मा. निता पाडाळे

संदर्भ :- मा. शत्रुघ्न काटे यांचा दिनांक 02/11/2012 रोजीचा प्रस्ताव

सांगवी येथील स. नं. 6 मधील मनपाने विकसीत केलेल्या उद्यानास मा. प्रभाग समिती ठराव क्र. 277 दि. 07/03/2011 चे नुसार स्वर्गीय तानाजीराव शितोळे उद्यान असे नामकरणास मंजूरी झाली असून सदर नावास दुरुस्ती होवून सदर उद्यानाचे नामकरण स्वर्गीय तानाजीराव शितोळे (सरकार) उद्यान असे करण्यात यावे. सदर संबंधीत उद्यानाचे मुळ जागा मालक असल्याने सदर प्रस्ताव मान्य करण्यास तसेच या उद्यानाबाबतचे यापुर्वीचे इतर प्रस्ताव रद्द करणेकामीच्या प्रस्तावास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव कायम होण्याची वाट न पाहता तातडीने पुढील कार्यवाही करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदरचा ठराव सर्वानुमते मान्य झाला

ठराव क्रमांक 51 विषय क्र. 02
दिनांक 02/11/2012 विभाग - स्थापत्य
सुचक - मा. नवनाथ जगताप अनुमोदक - मा. सुषमा तनपुरे

संदर्भ :- मा.नवनाथ नढे यांचा दिनांक 2/11/2012 रोजीचा प्रस्ताव.

प्रभाग क्रमांक 58 नवी सांगवी मधील श्री गणेश सहकारी बँक ते फेमस चौक या रस्त्यास श्री महालक्ष्मी मंदीर मार्ग असे व पुमस चौक ते वाघजाई मंदीर मिलीटरी हदद पर्यंतच्या रस्त्यास कै.बाळासाहेब श्रीपतराव ढमाले मार्ग असे नांवे देण्याकामीच्या प्रस्तावास मान्यता देणेत येत आहे.

सदरचा ठराव सर्वानुमते मान्य झाला.

ठराव क्रमांक 52 विषय क्र. 03
दिनांक 02/11/2012 विभाग - स्थापत्य
सुचक - मा. सुनीता वाघेरे अनुमोदक - मा. हिरानंद आसवानी

संदर्भ :- मा.सुनीता वाघेरे यांचा दिनाक 2/11/2012 रोजीचा प्रस्ताव.

प्रभाग क्रमांक 44 मधील पुढे नमुद केले प्रमाणे 1. शिवदत्तनगर, 2. कुदळे कॉलनी क्रमांक 1,2,3,4, 3. अतिथी हॉटेल गल्ली क्र.5, 4. नंदू जाधव मार्ग, 5. पुरुषोत्तम करपे पथ 6. मारुती कॉम्प्लेक्स रोड, 7. लडकत राडे, 8. पवना समाचार गल्ली 9. हेमू कॉलनी ोड. 10. साईचौक धनराज कॉम्प्लेक्स मार्ग . 11. मारुती कॉम्प्लेक्स मार्ग , 12. सी ब्लॉक क्र.1,2,3,4,5, 13. प्युष मार्ग चौक पथ कॉलनी यांची नांवे देणेकामीच्या प्रस्तावास मान्यता देणेत येत आहे.

सदरचा ठराव सर्वानुमते मान्य झाला.

ठराव क्रमांक 53 विषय क्र. 04
दिनांक 02/11/2012 विभाग - स्थापत्य
सुचक - मा. हिरानंद आसवाणी अनुमोदक - मा. सुनीता वाघेरे

संदर्भ :- मा.हिरानंद आसवाणी यांचा दिनांक 2/11/2012 रोजीचा प्रस्ताव.

प्रभाग क्रमांक 44 मध्ये गेलॉर्ड चौकातील टॉयलेट ब्लॉक आहे. परंतु सदर परिसरात त्या ब्लॉकचा गेले अनेक वषापासून कोणीही वापर करत नाही तसेच त्याचा अनेक गैर कामांसाठी गैरवापर होत आहे सदर ठिकाणच्या परिसरातील सर्व नागरीकांकडून ते टॉयलेट ब्लॉक काढून टाकण्यासाठी तक्रारी आलेल्या आहेत. तरी गेलॉर्ड चौकातील टॉयलेट ब्लॉक काढण्याकामीच्या प्रस्तावास मान्यता देणेत येत आहे.

सदरचा ठराव सर्वानुमते मान्य झाला.

ठराव क्रमांक 54 विषय क्र. 05
दिनांक 02/11/2012 विभाग - स्थापत्य
सुचक - मा.निता पाडाळे अनुमोदक - मा.सुषमा तनपुरे

संदर्भ :- मा.निता पाडाळे यांचा दिनांक 2/11/2012 रोजीचा प्रस्ताव.

काळेवाडी येथील शाळेच्या इमारतीची, गटाराची किरकोळ दुरुस्तीविषयक कामे करणे तसेच उरलेल्या राहिलेल्या भागात पेव्हींग ब्लॉक बसविणेकामीच्या प्रस्तावास मान्यता देणेत येत आहे.

सदरचा ठराव सर्वानुमते मान्य झाला.

ठराव क्रमांक 55 विषय क्र. 06
दिनांक 02/11/2012 विभाग - स्थापत्य
सुचक - मा.विनोद नढे अनुमोदक - मा.प्रमोद ताम्हणकर

संदर्भ :- मा.विनोद नढे यांचा दिनांक 2/11/2012 रोजीचा प्रस्ताव.

पुढे नमुद केलेप्रमाणे 1. ज्ञानेश्वरी मंगल कार्यालयासमोरील 9 मीटर रोडला कै.विशाल नढे मार्ग, 2. अष्टविनायक कॉलनी व कै.कोंडिबा नढे पथ असे नांव देणेस 3. सर्व्हे नं.113 विठठल रुक्मिनी मंदिरासमोरील चोकास पवना चौक असे रस्त्यास व चौकास नांवे देणेकामीच्या प्रस्तावास मान्यता देणेत येत आहे.

सदरचा ठराव सर्वानुमते मान्य झाला.

ठराव क्रमांक 56 विषय क्र. 07
दिनांक 02/11/2012 विभाग - स्थापत्य
सुचक - मा.निता पाडाळे अनुमोदक - मा. सुषमा तनपुरे

संदर्भ :- मा.निता पाडाळे यांचा दिनांक 2/11/2012 रोजीचा प्रस्ताव.

वाकड येथील कस्पटेवस्ती काळेवाडी फाटा (कस्पटे वस्तीकडे) असा नामकरणाचा फलक त्याचप्रमाणे कस्पटेवस्ती मानकर चौकाचे (कस्पटेवस्ती )असा नामकरणाचा फलक तसेच कस्पटेवस्तीकडून नाशिक हायवेला मिळणारा स.नं.259 चौक कस्पटेवस्ती चौक म्हणून नामकरण फलक तसेच स.नं.247 व 249 मधून जाणारा डिपी रस्ता शौर्य हॉटेल शेजारी कस्पटे कॉर्नर असा नाम फलक व कस्पटेवस्ती येथील स्मशानभूमिस ह.भ.प.सिताराम बुवा लक्ष्मण कस्पटे वैकुंठधाम असे नामकरण करण्याकामीच्या प्रस्तावास मान्यता देणेत येत आहे.

सदरचा ठराव सर्वानुमते मान्य झाला.

ठराव क्रमांक 57 विषय क्र. 08
दिनांक 02/11/2012 विभाग - स्थापत्य
सुचक - मा. स्वाती कलाटे अनुमोदक - मा. सुषमा तनपुरे

संदर्भ :- मा.विनय गायकवाड यांचा दिनांक 2/11/2012 रोजीचा प्रस्ताव.

प्रभाग क्रमांक 53 वाकड येथील कस्पटेवस्ती येथील स.नं.248 व कस्पटेवस्ती येथील स.नं.259 येथे हॉटेल शौर्य शेजारी कस्पटेवाडी वाकड हिंजवडी रोड येथे कस्पटे कॉर्नर व वाकड नाशिकरोड कस्पटेवस्ती स्मशानभूमि समोर कस्पटे चौक असे नांव देण्याकामीच्या प्रस्तावास मान्यता देणेत येत आहे.

सदरचा ठराव सर्वानुमते मान्य झाला.

यानंतर मा.अध्यक्ष यांनी सभा संपल्याचे प्रकट केले.

सही/-
निता विलास पाडाळे
अध्यक्षा
ड प्रभाग समिती,पिं.चिं.म.न.पा.,
रहाटणी, पुणे - 17

सही/-
प्रशासन अधिकारी सभा शाखा
ड प्रभाग समिती ,पिं.चिं.म.न.पा.,
रहाटणी, पुणे - 17

जा.क्र.ड/सभा/कावि/ 34 /2012
दिनांक 5 / 12 /2012

प्रति,
मा.श्री./श्रीमती -----------------------
सदस्य / सदस्या ड प्रभाग समिती,
पिंपरी चिंचवड महानगरपालिका